**मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर, जिल्हा - अमरावती या विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु यांना मुदतवाढ देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन आदेश क्र. संकीर्ण-२०२५/ई-१०५२०९७/विशि-५**

चौथा मजला, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४२२,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२

दिनांक:- २१ ऑगस्ट, २०२६

<u>वाचा</u> :- १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्र. संकीर्ण-२०१०/प्र.क्र.१२८/वि.शि.४ , दि. ०३/०९/२०२४

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्र. संकीर्ण-२०२५/ई-१०५२०९७/विशि-५ दि. २१/०८/२०२५

**शासन आदेश:-**

मराठी भाषा विद्यापीठ अधिनियम, २०२३ मधील कलम ८७ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन वाचा क्र. १ येथील शासन आदेशाद्वारे, महाराष्ट्र शासनाने डॉ. अविनाश आवलगावकर यांची मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर, जिल्हा - अमरावती या विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु म्हणून नियुक्ती केलेली आहे. सदर नियुक्तीस वाचा क्र. २ येथील शासन आदेशाद्वारे एक वर्ष मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर नियुक्तीचा कार्यकाल दि. ०४.०९.२०२६ रोजी संपुष्टात येत आहे. मराठी भाषा विद्यापीठ अधिनियम, २०२३ च्या कलम १०(३) मधील तरतूदीनुसार मा. कुलपतींद्वारे नियमित कुलगुरुंची नियुक्ती होण्यास काही अवधी लागण्याची शक्यता आहे. दरम्यान विद्यापीठाच्या कुलगुरुंचे पद रिक्त राहणे योग्य ठरणार नाही.

तरी मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर, जि. अमरावती या विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु डॉ. अविनाश आवलगावकर यांच्या नियुक्तीचा कालावधी या आदेशाद्वारे दिनांक ०५ सप्टेंबर, २०२६ पासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा मा. कुलपतींद्वारे नियमित कुलगुरुंची नियुक्ती होईपर्यत, या पैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत वाढविण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२१११०४४१८९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRATAP
PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2026.08.21 11:05:31 +05'30'

**(प्रताप पां. लुबाळ)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

डॉ. अविनाश आवलगावकर, कुलगुरु, मराठी भाषा विद्यापीठ, रिध्दपूर, जिल्हा - अमरावती.

**प्रत:-**

१) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, लोकभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उपमुख्यमंत्री (क्रिडा, रा.ऊ.शु.) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
९) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) सर्व सह सचिव / उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१/२ महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१२) महालेखापाल, (लेखा व परीक्षण)-१/२ महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१३) सह संचालक, उच्च शिक्षण, अमरावती.
१४) कुलसचिव, मराठी भाषा विद्यापीठ, रिध्दपूर , जिल्हा - अमरावती.
१५) सर्व वि.शि. कार्यासने, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) निवडस्ती (विशि-५)